# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in




प्रेस नोट क्रमांक :- १३३/२०२५ दिनांक :- २४/०३/२०२५.

## काशिमीरा वाहतुक विभागामार्फत तिस-या टप्प्यातील १०६ बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार.

काशिमिरा वाहतुक विभागाचे कामकाज सुरु झाल्यानंतर त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावर बेवारस स्थितीत पडलेली वाहने, अनेक दिवस रस्त्याच्या कडेला लावुन ठेवलेली वाहने,पादचा-यांना चालण्यास व वाहतुकीस अढथळा करित असलेली वाहने तसेच महानगरपालिका सफाई विभागास साफसफाई करतांना ज्या वाहनांचा अडथळा होऊ लागला तसेच वाहनांखाली अवती-भवती कचरा साठुन अस्वच्छता व रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याने सदरची बेवारस वाहने काशिमिरा वाहतुक विभागाकडुन मोटर वाहन कायदा कलम १२७ सह ममोवानी २२२ मधील अधिकारान्वये बेवारस वाहन टो-करुन ताब्यात घेउन महानगरपालिका प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेल्या कनकिया लक्ष्मीपार्क ,मिरारोड पुर्व येथील बंदिस्त सर्व्हे क्र.२५१ या जागेत ठेवण्यात आली आहेत.सदरची प्रक्रिया हि सुमारे गेल्या १० वर्षांपासुन सतत चालु असुन आतापर्यंत मोठया संख्येने विविध प्रकारची वाहने येथे ठेवण्यात आलेली आहेत आणि यामुळे सदरचा परिसर व्यापला असुन जागा अपुरी पडत आहे.

सदर ताब्यात असलेल्या बेवारस वाहनांपैकी १०६ तीन चाकी चार चाकी बेवारस वाहने ज्या कोणा व्यक्तींची असतील त्या व्यक्तींनी वाहनांच्या मुळ कागदपत्रासह पोलीस निरीक्षक, काशिमिरा वाहतुक शाखा यांना संपर्क साधावा अथवा ई-मेल **Pitrfashimira.mb-vv@ mahapolice .gov. in** अथवा मोबाईल नं.७७१००१२८९७ यावर संपक्र साधुन वाहनाची ओळख पटवुन मालकी हक्क शाबीत करुन ताब्यात घ्यावी .जर का सदर वाहने जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ६ महिन्याचे आत ताब्यात घेतली नाहीत तर सदर वाहनांची त्यांना आवश्यकता नाही असे गृहित धरुन सदर वाहने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ८२ प्रमाणे हक्क न सांगितलेली मालमत्ता समजुन म.पो.अधि.कलम ८५ ची प्रक्रिया राबवुन जाहीर लिलाव करुन येणारी रक्कतम म.पो.अधि.कलम ८७ प्रमाणे शासनाकडे जमा करण्यात येणार आहे.

तरी १०६ बेवारस वाहनांचे मालकांना आपली मालकी हक्क सिध्द करुन वाहने घेवुन जाणेबाबत मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

-------------------------